॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२६-२७/ ६९ दिनांक: - २९ /०८/२०२६

## परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर.

मा. संचालक विद्यापीठ उप परिसर पेठ, लातूर.

मा. संचालक विद्यापीठ उप परिसर,परभणी.

मा. प्राचार्य, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. समन्वयक कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.

विषय: महात्मा जोतिराव फुले द्वि जन्मशताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित महाड सत्याग्रह शताब्दी निमित्त 'फुले-आँबेडकर समता अभियान' राबविण्याबाबत.

संदर्भ: भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मिकांत देशमुख यांचे निवेदन पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा.कुलगुरु महोदयांच्या निर्देशनुसार आपणास कळविण्यात येते की, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मिकांत देशमुख यांच्या विनंतीनुसार आपल्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयांमध्ये आणि विद्यापीठ परिसर/उपपरिसरामध्ये वर्षभर "फुले-आंबेडकर समता अभियान" राबविण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

महात्मा जोतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक प्रबोधन तरुण पिढीमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अनुक्रमे अधोरेखीत केला आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात खालीलप्रमाणे सविस्तर नियोजन करून सदर अभियान राबविण्यात यावे:

१. अभियानाची सुरुवात व वातावरण निर्मिती (ऑगस्ट महिना)

- प्रत्येक महाविद्यालयाने, विद्यापीठ परिसराने व उपपरिसरांनी वातावरण निर्मितीसाठी ऑगस्ट महिन्यात एक भव्य 'समता मार्च' किंवा 'शोभायात्रा' काढावी.
- या फेरीत पथनाट्य, प्रेरणागीते, लेझीम, पारंपरिक वाद्ये, बँड व ढोल इत्यादींचा अंतर्भाव असावा.

२. समता-बंधुता शिबिराचे आयोजन.

- प्रत्येक महाविद्यालये , विद्यापीठ परिसराने व उपपरिसरांनी ऑगस्ट महिन्याच्या एका विकएंडला (शनिवार-रविवार) १०० विद्यार्थ्यांचे (समान सहभाग: ५०% मुले व ५०% मुली) रंजक व (संवादात्मक) पद्धतीचे समता-बंधुता शिबिर आयोजित करावे.

३. विद्यार्थी समता समितीची स्थापना.

- शिबिरातून ११ क्रियाशील व उत्साही विद्यार्थ्यांची निवड करून 'विद्यार्थी समता समिती' नियुक्त करण्यात यावी.
- या समितीच्या मार्गदर्शनासाठी महाविद्यालयातील दोन प्राध्यापकांची निवड करावी.
- ही समिती दर १५ दिवसांनी नियमित बैठक घेऊन पुढील उपक्रमांवर चर्चा करेल व अंमलबजावणी करेल.

Scanned with OKEN Scanner

४. विविध स्टुडंट्स क्लबची स्थापना (३ ते ५ विद्यार्थ्यांचा सहभाग)
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खालीलप्रमाणे सहा क्लब त्वरित स्थापित करावेत:

- बुक क्लब: दरमहा महात्मे/महापुरुषांच्या किंवा त्यांच्यावर लिहिलेल्या अन्य पुस्तकांवर चर्चा घडवून आणावी. दोन विद्यार्थ्यांनी पुस्तकावर आपला पेपर वाचावा. तसेच कवी संमेलन व कथाकथन आयोजित करावे.
- एनएसएस (NSS) उपक्रम: राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात फुले, आंबेडकर आणि भारतीय संविधानावर व्याख्याने आयोजित करावीत व ते गाव जातीमुक्त, स्त्री समताप्रधान आणि संविधानिक करण्यासाठी गावकऱ्यांना प्रवृत्त करावे.
- कल्चरल क्लब (सांस्कृतिक मंडळ): गाणी, नृत्य, एकांकिका व अभिवाचन हे कार्यक्रम वर्षभरात दोन-तीन वेळा सादर करावेत. NSS शिबिरात महापुरुषांच्या विचारांचे दर्शन घडवावे.
- स्पोर्ट्स क्लब: किल्ले सर करणे आणि क्रीडा स्पर्धा आयोजित करणे या माध्यमातून साहस, सांघिक वृत्ती आणि जात-धर्मविरहित मैत्री जोपासणे.
- फिल्म अँड ड्रामा क्लब: दर्जेदार माहितीपट व चित्रपट दाखवून त्यावर चर्चा घडवावी. (उदा. आचार्य अत्रे यांचा 'महात्मा फुले' मराठी चित्रपट, अनंत महादेवन यांचा 'फुले' हिंदी चित्रपट, निलेश जलमकर यांचा 'सत्यशोधक' चित्रपट, 'भारत एक खोज' मालिकेतील फुले एपिसोड तसेच डॉ. आंबेडकर, गांधी, पटेल व नेहरू यांच्यावरील चित्रपट). तसेच एकांकिका बसविणे व नाटक अभिवाचन करणे.
- डिबेट क्लब (संवाद व वादविवाद मंडळ): दर पंधरा दिवसांनी संविधान, लोकशाही, समाजवाद, नागरिकांची कर्तव्ये आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी अभ्यास करून विषय मांडणे व चर्चा करणे.

सदर उपक्रम राबविल्यास विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास व वैचारिक प्रगल्भतेत वाढ होण्यासाठी मोठी मदत होईल. त्यामुळे सर्व संलग्नित महाविद्यालयांनी, विद्यापीठ परिसराने व उपपरिसरांनी आपल्या स्तरावर योग्य नियोजन करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठ विकास विभागास सादर करावा, ही विनंती.

(डॉ. राजपालसिंह चिखलीकर)
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलगुरू महोदय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
३. जनसंपर्क अधिकारी (माहितीसाठी व प्रसारासाठी).

प्रत पुढील कार्यवाहीस्तव सादर :

१. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. सर्व सदस्य, विद्यार्थी विकास कक्ष समिती, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
५. सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी). **महात्मा जोतिराव फुले द्वि जन्मशताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणिनीत महाड सत्याग्रह शताब्दी निमित्त 'फुले-आंबेडकर समता अभियान' राबविण्याबाबत.** या शीर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

विद्यार्थी विकास विभाग स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड

Scanned with OKEN Scanner

# लक्ष्मीकांत देशमुख

IAS (नि)
अध्यक्ष भाषा सल्लागार समिती
Mobile : +919325297509
E-mail : laxmikant05@yahoo.co.in

पत्ता :
श्रीनिवास गार्डन,
बी/2, केदारनाथ
मंदिराजवळ,
मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर,
पुणे ४११०१६


प्रती
मा. कुलगुरू
स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ
नांदेड


स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड
कुलसचिव कार्यालय
11 JUL 2025
आवक क्र. 2043

विद्यार्थी विकास विभाग
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड
आवक क्र. 09 दि.15/07/2026


आदरणीय महोदय

विषय : महात्मा फुले द्विजन्मशताब्दी (11एप्रिल 2026 ते 10 एप्रिल 2027)आणि डॉ आंबेडकर प्रणित महाड सत्यागृहाच्या शताब्दी ( 20 मार्च 2926 ते 19 मार्च 2027)निमित्त आपल्या विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयात वर्षभर
" फुले आंबेडकर समता अभियान"राबविणे बाबत

सर,

महात्मा फुलें आणि डॉ. आंबेडकरांचे विचार हे सत्यधर्म, विषमता निर्मूलन आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक व आर्थिक न्याय या संविधानाच्या पंचसूत्रांत सामावले आहेत. उद्याचा लोकशाहीवादी विकसित भारत 2047, जे भारताच्या प्रधान मंत्र्यांचे स्वप्न आहे, ते साकार करण्यासाठी म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्या व विचार आणि संविधानिक मूल्ये महाविद्यालयातीन तरुण वर्गाट रुजविण्यासाठी त्यांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने साने गुरुजींच्या आंतर भारती, राष्ट्र सेवा दल आणि महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठान या शालेय विद्यार्थी व तरुण वर्गात काम करणाऱ्या संस्थांच्या वतीने खालील प्रमाणे सविनय सादर करीत आहे. आम्ही या संस्था, आपले विद्यापीठ आणि व राष्ट्रीय सेवा योजना सोबत काम करत फुले व आंबेडकरांचे विचार तरुणांईपर्यंत नेण्यासाठी व त्याची त्यांच्या मनात व विचारात रुजवण करण्यासाठी काही कार्यक्रम आखले आहेत, ते आपल्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करत आहे. हे कार्यक्रम व आपण तसेच आपले प्राध्यापक सुचवतील ते उपक्रम एकत्र करुन आपल्या मार्गदर्शनाप्रमाणे आपल्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विद्यापीठच्या वतीने मिळून कार्यान्वित करण्यासाठी मी लक्ष्मीकांत देशमुख, माजी संमेलनध्यक्ष आणि विद्यमान अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती आपणापुढे सविनय सदर करीत आहे.

एक ) प्रत्येक महाविद्यालयात पुढील प्रमाणे "फुले आंबेडकर अभियान समता अभियान" राबविण्याचे प्रस्तावित आहे.

अ ) प्रत्येक कॉलेजने वातावरण निर्मितीसाठी एक भव्य समता मार्च किंवा शोभयात्रा काढून न " फुले आंबेडकर समता अभियान " ऑगस्ट महिन्यात सुरु करावे . त्या वेळी पथनाट्य, गाणी, लेझीम, बँड ढोल आदिंचा अंतर्भाव असावा

DSD / Dr. Babaheb Ambedkar Chair & Research Centre

Scanned with OKEN Scanner

3) प्रत्येक कॉलेजने ऑगस्ट च्या एका विकएंडला ( म्हणजे शनिवार - रविवारी) 100 विदर्याथ्यांचे - त्यात निम्या मुली असतील, रंजक व Interactive पद्धतीचे समता - बंधुता शिबीर आयोजित करावे.

ब ) या शिबिरातून 11 क्रियाशील व उत्साही विदर्यार्थी निवडून त्यांची विद्यार्थी समता समिती नियुक्त करावी. त्या समितीवर दोन प्राध्यापक यांची मार्गदर्शक म्हणून निवड करावी.

क ) ही विदर्यार्थी समता समिती दर 15 दिवसाला भेटेल व चर्चा करेल.

ड ) या समितीने खालील स्टुडंट्स क्लब त्वरित स्थापित करावेत. ते तीन ते पाच विदर्याथ्यांचे असतील

1 ) बुक क्लब : उद्देश दर महा फुले / आंबेडकर / गांधीजींच्या पुस्तकांवर किंवा त्यांच्यावर लिहिलेल्या अन्य लेखकांच्या एका पुस्तकांवर चर्चा घडवून आणावी. त्यावेळी दोन विदर्यार्थी आपले पुस्तकावरील पेपर वाचतील. तसेच हा क्लब कवी संमेलन आणि कथा कथन आदी कार्यक्रम पण आयोजित करेल.

2))कॉलेजच्या NSS शिबिरात फुले,आंबेडकर आणि भारतीय संविधानावर व्याख्याने आयोजित करावीत व ते गाव जातीमुक्त, स्त्री समता प्रदान व संविधानिक करण्यासाठी गावकऱ्यांना प्रवृत्त करावे.

3) कल्चरल क्लब : हा क्लब गाणी, नृत्य, एकांकिका, अभिवाचन असे कार्यक्रम वर्षभरात दोन तीन वेळा सादर करेल. NSS च्या शिबिरात हा ग्रुप गाणी, कविता व एकपात्री अभिनयद्वारे महापुरुषांच्या विचारांचे दर्शन घडवील

4 ) स्पोर्ट्स क्लब : याद्वारे किल्ले सर करणे, क्रीडा स्पर्धा,आयोजित करणे आदी उपक्रमातून साहस, सांघिक वृत्ती आणि जात / धर्म विरहित मैत्री जोपसणे हे साधेल.

5 ) फिल्म अँड ड्रामा क्लब :

यु ट्यूब वरील व अन्य मार्गाने उत्तम दर्जेदार चित्रपट दाखवणे, त्यावर चर्चा करणे. उदा . आचार्य अत्रे( महात्मा फुले - मराठी )अनंत महादेवन (फुले - हिंदी )आणि निलेश जलमकर यांचा ' सत्यशोधक हे फुले यांच्यावरील चित्रपट व भारत एक खोज सिरीयल मधील फुले एपिसोड तसेच डॉ आंबेडकर, गांधी, पटेल व नेहरू आदिवरील चित्रपट दाखवणे, एकांकिका बसविणे आणि नाटकांचे अभिवाचन करणे या उपक्रमातून प्रबोधनासाठी कला याचा प्रत्यय आणून देणे.

6 ) डिबेट क्लब : दर पंधरा दिवसांनी संविधान, लोकशाही, समाजवाद, नागरिकांची कर्तव्ये आदी विषयावर विध्यार्थ्यांनी अभ्यास करुन विषय मांडणे आणि चर्चा करणे. यातून विद्यार्थी चिकित्सक व बहुश्रुत होतील.

7 ) इतर उपक्रम :

°°°यंदा कॉलेजची सहल ही महापुरुषांच्या गावी, किल्ले, स्मारके आदी ठिकाणी आयोजित करावी. उदा. आनंदवन, हेमलकसा, शोधग्राम, वर्धा अशीहl service places ची ट्रिप आखता येईल. ट्रेकिंग, अभयारण्य, जंगल भ्रमण असेही करता येईल.

°°° कॉलेजच्या विद्यार्थी व प्राध्यापकांचे साहित्य संमेलन घेणे, स्नेहसंमेलनत फुले आंबेडकरांच्या जीवनावरील एकांकिका / नाटक सादर करणे.भीम जलसा, कलापथक. कॉलेजचा वार्षिक अंक हा फुले, आंबेडकर केंद्रीत साहित्याचा प्रसिद्ध करणे

°°°° दर महिन्याला प्रत्येक क्लबचा एक कार्यक्रम झाला पाहिजे असे नियोजन करणे

°°°°°°°°°°°°°°°°°°°°

दोन ) विद्यापीठाने फुले विचार व समाजसुधारांच्या कामावर आणि डॉ आंबेडकरांवर असे दोन राष्ट्रीय सेमिनार इंग्रजी व मराठीत घेणे. उत्तम पेपरचे पुस्तक बनवणे. शक्य असेल तर एका परदेशी विद्यापीठात ज्याच्याशी आपल्या विद्यापीठाचे टायअप आहे , तेथे शक्य असेक तर एक आंतरराष्ट्रीय सेमिनार आयोजित करणे.

तीन ) विद्यापीठ स्तरावर फुले आंबेडकरांवर वक्तृत्व, निबंध, एकांकिका व पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजित करणे.

चार ) प्राध्यापकांना विविध ठिकाणी जाऊन व्याख्यान देणे व पॉडकास्ट करण्यासाठी उत्तेजन देणे.

पाच ) एक विद्यापीठस्तरीय फुले आंबेडकर विचार व कार्य केंद्रीत साहित्य कला उत्सव घेणे.

सहा ) एक क्रीडमहोत्सव घेणे.

Scanned with OKEN Scanner

सर, हे सर्व उवक्रम विद्यापीठाने आपले स्वत:चे म्हणून राबवावेत अशी नम्र विनंती आहे. त्यासाठी आम्ही आपल्या मार्गदर्शनाखाली काम करू, ही ग्वाही देतो.

तरी या बाबत आपण एक मिटिंग आपल्या अध्यक्षतेखाली आयोजित करावी, त्याला मी व आमचे काही सहकारी उवस्थित राहू व मिळून कार्यक्रम ठरवू, असे आमचे नम्र निवेदन आहे

आपल्या प्रतिसादच्या अपेक्षेत
आपला विश्वासू
लक्ष्मीकांत देशमुख IAS ( नि )
अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner